भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# श्रमिक पत्रकार ( वेतनदर - निश्चिती ) अधिनियम, १९५८

(१९५८ चा अधिनियम क्रमांक २९)

[३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The Working Journalists (Fixation of Rates of Wages) Act, 1958

**(Act No. 29 of 1958)**

[As in force on the 31st August 1995]


संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९९६

[किंमत : रु. ]

[illegible]]

# श्रमिक पत्रकार (वेतनदर-निश्चिती) अधिनियम, १९५८

(१९५८ चा अधिनियम क्रमांक २९)

( रोजी यथाविद्यमान)

[१६ सप्टेंबर १९५८]

श्रमिक पत्रकारांच्या बाबतीतील वेतनदर-निश्चिती व तत्संबंधित बाबी याबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. या अधिनियमास 'श्रमिक पत्रकार (वेतनदर-निश्चिती) अधिनियम, १९५८' असे म्हणता[१] येईल. संक्षिप्त नाव.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "समिति" याचा अर्थ, कलम ३ खाली स्थापन केलेली समिती, असा आहे;

(ख) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ग) "वेतन मंडळ" याचा अर्थ, श्रम मंत्रालय, भारत सरकार अधिसूचना क्र. एस.आर.ओ. १०७५, दिनांक २ मे, १९५६ द्वारा 'श्रमिक पत्रकार अधिनियमा' खाली स्थापन केलेले वेतन मंडळ, असा आहे ;

(घ) "वेतन मंडळाचा निर्णय" याचा अर्थ, गॅझेट ऑफ इंडिया, असाधारण, भाग दोन, कलम ३, दिनांक ११ मे, १९५७ यामध्ये प्रकाशित झालेले वेतन मंडळाचे निर्णय, असा आहे;

(ङ) "वेतन" याचा अर्थ, 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे वेतन, असा आहे;

(च) "श्रमिक पत्रकार अधिनियम" याचा अर्थ 'श्रमिक पत्रकार (सेवा-शर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५,' (१९५५ चा ४५) , असा आहे ;

(छ) या अधिनियमात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या आणि 'श्रमिक पत्रकार अधिनियमा'त व्याख्या केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना त्या अधिनियमात त्यांना नेमून दिले असतील त्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.

३. (१) वेतन मंडळाच्या निर्णयासंबंधातील सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १९ मार्च, १९५८ च्या न्यायनिर्णयाच्या अनुरोधाने आणि अन्य सर्व संबद्ध परिस्थितीच्या अनुरोधाने केंद्र सरकारला श्रमिक पत्रकारांच्या बाबतीत वेतनदर निश्चित करणे शक्य व्हावे यासाठी केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पुढील व्यक्तींचा समावेश असलेली एक समिती स्थापन करील, त्या अशा :— समितीची स्थापना.

(एक) सहसचिवाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा केंद्र सरकारने नामनिर्देशित केलेला विधि मंत्रालयाचा अधिकारी—हा अधिकारी या समितीचा अध्यक्ष असेल ;

(दोन) केंद्र सरकारने गृह, श्रम व सेवायोजन तसेच सूचना व प्रसारण या प्रत्येक मंत्रालया-तील अधिकाऱ्यांमधून नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती ;

(तीन) केंद्र सरकारने नामनिर्देशित केलेला सनदी लेखाकार.

(२) जर कोणत्याही कारणास्तव (तात्पुरत्या अनुपस्थितीच्या कारणास्तव नव्हे तर अन्यथा) समितीच्या अध्यक्षाचे किंवा अन्य कोणत्याही सदस्याचे पद रिक्त झाले तर, केंद्र सरकारला ते रिक्त पद भरण्यासाठी पोटकलम (१) च्या उपबंधानुसार दुसरी एखादी व्यक्ती नियुक्त करता येईल, आणि पद रिक्त झाले तेव्हा समितीपुढे चालू असलेली चौकशी ज्या टप्प्यावर होती तेथून ती पुढे चालू ठेवता येईल.

(३) केंद्र सरकार समितीच्या सचिवाची नियुक्ती करू शकेल, आणि समितीला आवश्यक असेल तितका आणखी कर्मचारीवर्गही पुरवू शकेल.

(४) सचिव हा समिती किंवा तिचा अध्यक्ष त्याला नेमून देईल किंवा त्याच्याकडे प्रत्यायोजित करील, अशी प्रशासी किंवा अन्य स्वरुपाची कार्ये पार पाडील.

४. (१) समिती, तिला योग्य वाटेल अशा रीतीने प्रकाशित केलेल्या नोटीशीद्वारे, वृत्तपत्र आस्थापना व श्रमिक पत्रकार आणि वेतन मंडळ निर्णयामध्ये हितसंबंधित असलेल्या अन्य व्यक्ती यांना, वेतन मंडळाच्या निर्णयाच्या संबंधात, तसेच श्रमिक पत्रकारांच्या बाबतीत या अधिनियमाखाली निश्चित करण्यात येतील अशा वेतनदारांच्या संबंधात त्यांना योग्य वाटतील अशी अभिवेदने करण्याचे आवाहन करील. समितीची कार्ये.

---

१. १९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व अनुसूची भाग—एक द्वारे पॉंडिचेरीपर्यंत विस्तारीत करण्यात आला.

(२) असे प्रत्येक अभिवेदन हे लेखी असेल आणि समिती नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करील अशा जास्तीत जास्त तीस दिवसांच्या कालावधीमध्ये ते करण्यात येईल आणि त्यात पुढील गोष्टी नमूद करण्यात येतील :—

(क) वेतन मंडळाच्या निर्णयाबाबत आक्षेप घेण्यास काही विशिष्ट कारणे असल्यास, ती कारणे ;

(ख) अभिवेदन करणाऱ्या व्यक्तीच्या मते जे वेतनदर, ते देण्याची नियोक्त्याची क्षमता किंवा अभिवेदन करणाऱ्या व्यक्तीला आपल्या अभिवेदनाच्या बाबतीत जी संबद्ध वाटेल ती ती अन्य कोणतीही परिस्थिती लक्षात घेतल्यानंतर वाजवी वाटत असतील ते वेतनदर ;

(ग) वेतन मंडळाच्या निर्णयामध्ये जे फेरबदल किंवा आपरिवर्तने केली जावीत असे अभिवेदन करणाऱ्या व्यक्तीचे मत असेल असे काही फेरबदल किंवा आपरिवर्तने असल्यास, ती आणि त्यांची कारणे.

(३) समिती पूर्वोक्त अशी काही अभिवेदने असल्यास ती विचारात घेईल आणि वेतनमंडळापुढे ठेवलेली सामग्री, तसेच त्यानंतर त्याने या अधिनियमाखाली मिळवली असेल किंवा त्याला उपलब्ध करून देण्यात आली असेल अशी आणखी सामग्री तपासून पाहिल्यानंतर ती तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे केंद्र सरकारला श्रमिक पत्रकारांच्या बाबतीत वेतनदर निश्चित करण्याबाबत शिफारशी करील—मग त्या शिफारशी वेतन मंडळाच्या निर्णयाचे आपरिवर्तन म्हणून असोत वा अन्यथा असोत ; आणि अशा कोणत्याही शिफारशीमध्ये वेतनदार कोणत्या दिनांकापासून परिणामक व्हावेत तो दिनांक—मग तो भविष्यलक्षी असो किंवा भूतलक्षी असो—विनिर्दिष्ट करता येईल.

(४) केंद्र सरकारला कोणतीही शिफारस करताना, समिती 'श्रमिक पत्रकार अधिनियमा' चे कलम ९ पोटकलम (१) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व बाबी लक्षात घेईल.

(५) समितीला, जर तिला योग्य वाटत असेल तर, वर्गीकरणाच्या तत्त्वावर किंवा अन्य कोणत्याही तत्त्वावर वृत्तपत्र आस्थापनांचे गट किंवा त्यांचे वर्ग अलगअलगपणे विचारार्थ घेता येतील, आणि अशा प्रत्येक गटाच्या किंवा वर्गाच्या संबंधात वेळोवेळी शिफारशी करता येतील.

**समितीच्या शक्ती.** ५. (१) पोटकलम (२) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, समितीला 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) याखाली स्थापन केलेले औद्योगिक अधिकरण त्याच्याकडे सोपवलेल्या औद्योगिक विवादाचा अभिनिर्णय करण्यासाठी ज्या शक्ती वापरते त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्तीचा वापर करता येईल आणि तिला या अधिनियमात अंतर्भूत असलेले उपबंध व त्याखाली काही नियम केले असल्यास ते नियम यांच्या अधीनतेने आपली स्वतःची कार्यपद्धती विनियमित करण्याची शक्ती असेल.

(२) समितीला केलेली कोणतीही अभिवेदने किंवा पुरावा म्हणून तिला सादर केलेले कोणतेही दस्तऐवज, त्याबाबतीत हितसंबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीने विहित असेल तेवढी फी दिल्यावर तिला ते पाहता यावेत यासाठी खुले ठेवण्यात येतील.

(३) कोणतेही हिशेब किंवा दस्तऐवज यांची तपासणी करणे किंवा कोणत्याही व्यक्तीची कोणतीही निवेदने घेणे आवश्यक आहे असे जर समितीला कोणत्याही चौकशीच्या ओघात आढळून आले तर, समिती त्याबाबतीत केंद्र सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याला (यात यापुढे 'प्राधिकृत अधिकारी' म्हणून निर्देशिलेला) प्राधिकृत करू शकेल आणि असा प्राधिकृत अधिकारी समितीचे काही निदेश असल्यास, त्यांच्या अधीनतेने हिशेब किंवा दस्तऐवज तपासून पाहील किंवा त्या व्यक्तीची निवेदने घेईल.

(४) प्राधिकृत अधिकाऱ्याला समितीचे काही निदेश असल्यास त्यांच्या अधीनतेने, 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) कलम ११ पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) खाली औद्योगिक अधिकरणाला वापरता येतील अशा सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्तींचा वापर करता येईल.

(५) 'भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२' (१९२२ चा ११) कलम ५४, पोटकलम (१) किंवा कोणताही कर बसविण्याच्या संबंधात त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामधील कोणताही समनुरुप उपबंध यांतील कोणतीही गोष्ट, प्राधिकृत अधिकाऱ्याने समितीला केलेल्या कोणत्याही अहवालामध्ये निर्देशित केलेल्यांपैकी कोणताही तपशील उघड करण्याबाबत लागू होणार नाही.

(६) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकृत अधिकाऱ्याने आपल्या शक्तीचा वापर करताना मिळवलेली कोणतीही माहिती आणि त्याने दिलेला कोणताही अहवाल गोपनीय असल्याचे समजण्यात येईल, परंतु या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या संबंधातील कोणत्याही बाबतीत केंद्र सरकारकडे किंवा न्यायालयाकडे अशी माहिती किंवा अहवाल उघड करण्याच्या बाबतीत या पोटकलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(७) प्राधिकृत अधिकारी हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**समितीच्या शिफारशी अंमलात आणण्याची केंद्र शासनाची शक्ती.**

६. (१) समितीच्या शिफारशी मिळाल्यानंतर, होईल तितक्या लवकर, केंद्र सरकार, शिफारशींवर हुकूम किंवा केंद्र सरकारच्या मते ज्या आपरिवर्तनामुळे शिफारशींच्या स्वरूपात महत्त्वाचा फेरबदल होत नसून जी त्याला योग्य वाटतील अशी काही आपरिवर्तने असल्यास त्यांच्यासह तो आदेश काढील.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारला जर स्वतःला योग्य वाटले तर,—

(क) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या स्वरूपाची नसलेली अशी त्याला योग्य वाटतील ती आपरिवर्तने शिफारशींमध्ये करता येतील :

परंतु, अशी कोणतीही आपरिवर्तने करण्यापूर्वी केंद्र सरकार, त्यामुळे बाधित होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींना विहित असेल त्या रीतीने नोटीस देईल आणि याबाबत त्यांनी केलेली कोणतीही लेखी अभिवेदने विचारात घेईल, किंवा

(ख) शिफारशी किंवा त्यांचा कोणताही भाग समितीकडे निर्देशित करता येईल व त्याबाबतीत, केंद्र सरकार समितीच्या त्यानंतरच्या शिफारशी विचारात घेईल आणि त्या शिफारशींनुसार किंवा पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या स्वरूपाच्या, त्याला योग्य वाटतील अशा आपरिवर्तनांसह आदेश काढील.

(३) केंद्र शासनाने काढलेला प्रत्येक आदेश त्या आदेशासंबंधी समितीने केलेल्या शिफारशींसहित शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येईल आणि तो आदेश प्रकाशनाच्या दिनांकी, किंवा आदेशामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा दिनांकी भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी परिणामासह अंमलात येईल.

**श्रमिक पत्रकार आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांपेक्षा कमी, नसलेल्या दरांनी वेतन मिळण्यास हक्कदार असावयाचे.**

७. कलम ११ मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधाच्या अधीनतेने, केंद्र सरकारचा आदेश अंमलात आल्यावर प्रत्येक श्रमिक पत्रकार, त्याच्या नियोक्त्याकडून विवक्षित दराने वेतन मिळण्यास हक्कदार असेल आणि कोणत्याही परिस्थितीत तो दर आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेतन दराहून कमी असणार नाही.

८. (केंद्र शासनाच्या आदेशाचे पुनरिक्षण) श्रमिक पत्रकार (विशोधन) अधिनियम, १९६२, कलम १० द्वारे निरसित (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

**श्रमिक पत्रकारांना देय असणाऱ्या पैशाची वसुली.**

९. (१) जर या अधिनियमाखाली नियोक्त्यांकडून श्रमिक पत्रकाराला कोणतीही रक्कम देय असेल तर, [1][त्या श्रमिक पत्रकाराला स्वतःला किंवा याबाबतीत त्याने लेखी प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला किंवा श्रमिक पत्रकाराचा मृत्यू झाला असेल त्याबाबतीत त्याच्या कोणत्याही कुटुंबियाला,] वसुलीच्या अन्य कोणत्याही पद्धतीला बाध न येता, त्याला देय असणाऱ्या रकमेसाठी राज्य शासनाकडे अर्ज करता येईल, आणि जर राज्य शासनाची किंवा राज्य शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाची असा कोणताही पैसा देय असल्याबद्दल खात्री झाली तर, ते त्या रकमेबाबतचे एक प्रमाणपत्र जिल्हाधिकाऱ्याला देईल आणि जिल्हाधिकारी ती रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याची कार्यवाही करील.

[2][(२) या अधिनियमाखाली नियोक्त्याकडून श्रमिक पत्रकाराला देय असलेल्या रकमेबाबत कोणताही प्रश्न उद्भवल्यास तो प्रश्न केंद्र सरकारला स्वतः होऊन किंवा त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) याखाली किंवा औद्योगिक विवादांचे अन्वेषण व निटवणूक यांच्या संबंधात राज्यामध्ये अंमलात असणाऱ्या समनुरूप कायद्याखाली घटित केलेल्या कोणत्याही श्रमिक न्यायालयाकडे निर्देशित करता येईल आणि या प्रमाणे निर्देशित केलेला प्रश्न हा जणू काही त्या अधिनियमाखाली किंवा कायद्याखाली श्रमिक न्यायालयाकडे अभिनिर्णयासाठी निर्देशित केलेली बाब असावी त्याप्रमाणे श्रमिक न्यायालयांच्या संबंधात उक्त अधिनियम किंवा कायदा परिणामक होईल.]

(३) श्रमिक न्यायालय ज्या राज्य शासनाने निर्देशन केले असेल त्याच्याकडे आपला निर्णय पुरःवृत्त करील आणि श्रमिक न्यायालयाने ठरवलेली कोणतीही देय रक्कम पोटकलम (१) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने वसूल करता येईल.

---

१. १९६२ चा अधिनियम ६५, कलम १० द्वारे, "श्रमिक पत्रकाराला" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या त्याच कलमाद्वारे, पोटकलम (२) ऐवजी दाखल करण्यात आले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

समितीचे आदेश, पत्रे, इत्यादींचे अधिप्रमाणन.

१०. समितीचा अध्यक्ष किंवा सचिव किंवा यांबाबतीत समितीने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी यांना या अधिनियमाखाली समितीने दिलेल्या किंवा काढलेल्या सर्व नोटिसा, पत्रे, प्राधिकृतिपत्रे आदेश किंवा अन्य दस्तऐवज अधिप्रमाणित करता येतील आणि याप्रमाणे अधिप्रमाणित केलेली कोणतीही नोटीस, पत्र, प्राधिकृतपत्रे, आदेश किंवा अन्य दस्तऐवज समितीने रीतसर दिले होते किंवा काढले होते असे गृहीत धरले जाईल.

'श्रमिक पत्रकार अधिनियम' इत्यादींवर या अधिनियमाचा परिणाम.

११. (१) 'श्रमिक पत्रकार अधिनियमा'ची कलमे ८, १०, ११, १२ आणि १३ ही समितीच्या संबंधात परिणामक होणार नाहीत.

(२) या अधिनियमाचे उपबंध हे कोणताही निवाडा, करार किंवा सेवा-संविदा---मग ते या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेले असोत किंवा नंतर केलेले असोत---यांच्या अटींमध्ये त्या उपबंधांशी विसंगत असे काहीही असले तरी परिणामक होतील :

परंतु, एखादा पत्रकार हा एखाद्या बाबतीत या अधिनियमाखाली ज्या लाभांना हक्कदार असेल यापेक्षा निवाडा, करार, सेवा-संविदा यांखाली किंवा अन्यथा तो अधिक अनुकूल लाभांना हक्कदार होत असेल तर, या अधिनियमाखाली अन्य बाबतीत लाभ मिळत असले तरीही तो त्या एखाद्या बाबतीत त्या अधिक अनुकूल लाभांना हक्कदार असण्याचे चालू राहील.

(३) या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट कोणत्याही श्रमिक पत्रकाराला एखाद्या बाबतीत तो या अधिनियमाखाली ज्या लाभांना हक्कदार होऊ शकेल त्यापेक्षा अधिक अनुकूल असलेले अधिकार व विशेषाधिकार त्याला दिले जावेत यासाठी एखाद्या नियोक्त्याशी कोणताही करार करण्यास प्रतिबंधक आहे असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.

रिक्त पदे इत्यादींमुळे समितीची कार्यवाही विधिबाह्य ठरावयाची नाही.

१२. समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, केवळ तिच्या सदस्यांमध्ये एखादे पद रिक्त झाले आहे किंवा तिच्या घटनेमध्ये कोणताही दोष आहे या कारणावरून विधिबाह्य ठरणार नाही.

दंड.

[1][१२क. (१) जो कोणताही नियोक्ता कलम ७ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करील तो दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

(२) जो कोणी पोटकलम (१) खालील कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवलेला असतांना, पुन्हा त्या पोटकलमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल तो पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

(३) एखाद्या कंपनीने अपराध केलेला असेल त्याबाबतीत अपराध केला त्यावेळी जी कोणतीही व्यक्ती कंपनीच्या कामकाज-चालनाबद्दल कंपनीची प्रभारी असेल व तिला जबाबदार असेल ती प्रत्येक व्यक्ती त्या अपराधाबद्दल दोषी मानली जाईल आणि तिच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास, तसेच त्यानुसार शिक्षा केली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, शिक्षेस पात्र असणाऱ्या अशा व्यक्तीने, तो अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये यासाठी आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे शाबीत केले तर या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या कलमामध्ये उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(४) पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या कलमाखालील एखादा अपराध कंपनीने केलेला आहे व कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने अपराध करण्यात आला आहे अथवा त्याने केलेल्या अक्षम्य हयगयीशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे हे शाबीत करण्यात येईल तेव्हा, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा देखील दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र असेल.

(५) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ कोणताही निगम-निकाय असा आहे आणि त्यात, पेढी किंवा अन्य व्यक्तिसंघ यांचा समावेश आहे ; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.]

---

१. १९६२ चा अधिनियम ६५, कलम १० द्वारे समाविष्ट करण्यात आले (१५ जानेवारी, १९६३ रोजी व तेव्हापासून).

**१३.** (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत:, आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील गोष्टींबाबत उपबंध करता येईल :—

(क) या अधिनियमाखालील नोटिसा प्रकाशित करण्याची रीत ;

(ख) या अधिनियमाखालील आपल्या शक्तींचा वापर करताना समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ग) समितीच्या कोणत्याही सदस्याकडे सोपवता येतील अशा तिच्या शक्ती व कार्ये ;

(घ) समितीला सादर केलेल्या दस्तऐवजांच्या निरीक्षणासाठी द्यावयाची फी.

[1][ (३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

[2][१४. [निरसन व व्यावृत्ती] निरसन व विशोधन अधिनियम, १९६०, कलम २ व अनुसूची एक द्वारे निरसित.]

---

१. १९८६ चा अधिनियम ४, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१४ जानेवारी १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. १९६० चा अधिनियम ५८, कलम २ व पहिली अनुसूची याद्वारे निरसित.

दी वर्किंग जर्नालिस्ट्स (फिक्सेशन ऑफ रेट्स ऑफ वेजेस) ॲक्ट, १९५८ चा वरील मराठी अनुवाद हा, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३, कलम २, खंड (क) अन्वये **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यासाठी राष्ट्रपती महोदयांनी प्राधिकृत केला आहे.

सचिव, भारत सरकार.

राष्ट्रपतीने दी वर्किंग जर्नालिस्ट्स (फिक्सेशन ऑफ रेट्स ऑफ वेजेस) एक्ट, १९५८ के उपर्युक्त मराठी अनुवादको प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ की धारा २ के खण्ड (क) के अधीन **शासकीय राजपत्र** में प्रकाशित किए जाने के लिए प्राधिकृत कर दिया है।

सचिव, भारत सरकार।

The above translation in Marathi of the Working Journalists (fixation of Rates of wages) Act, 1958 has been authorised by the President to be published in the *Official Gazette* under Clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973.

Secretary to the Government of India.

New Delhi :

Dated

(शा.म.मु.)एच ४२०१—३(७—२—९५)